

नागरी बँकांच्या अधुनिकीकरणाला चालना



I do, what I do

A2

अमृतवेल

December 2017 / ₹ : 100/-

# मनी प्लस

www.amrutwelmedia.com



संजय लेले
अध्यक्ष, जनता सहकारी बँक, पुणे

## जनतेची बँक बनावी यासाठी...





*इंडो-डच तंत्रज्ञान सेंटर ऑफ एक्सलन्सच्या उद्घाटनप्रसंगी कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना जैन इरिगेशनचे विपणनप्रमुख अभय जैन. दुसऱ्या छायाचित्रात जैन इरिगेशनने उभारलेल्या प्रकल्पाची पाहणी करताना नेदरलँडचे कृषिमंत्री अल्ड्रेक खिअरवेल्ड, कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर, पालकमंत्री गिरीष बापट, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार व मान्यवर.*

# जैन इरिगेशनचा नेदरलँडच्या कृषिमंत्र्यांकडून गौरव

नवीन युगात कृषिक्षेत्रात एकत्र काम करण्याची गरज जगाला आहे. यामध्ये भारतातील जैन इरिगेशनचे योगदान महत्त्वाचे आहे. नवीन तंत्रज्ञान, संशोधनासह सर्वच पातळींवर कंपनी आघाडीवर आहे. याची प्रचिती बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात उभारण्यात आलेल्या भाजीपाला गुणवत्ता केंद्रात येते, असा गौरवपूर्वक उल्लेख नेदरलँडचे कृषिमंत्री अल्ड्रेक खिअरवेल्ड यांनी केला.

बारामती कृषी विज्ञान केंद्रात जैन इरिगेशनच्या सहकार्याने इंडो-डच तंत्रज्ञानावर आधारित उभारण्यात आलेल्या भाजीपाला गुणवत्ता केंद्राचे उद्घाटन कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर व नेदरलँडचे कृषिमंत्री अल्ड्रेक खिअरवेल्ड यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षस्थानी झालेल्या या समारंभाला अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षकमंत्री गिरीष बापट, नेदरलँडचे कृषितज्ज्ञ वुटर व्हरे, खासदार सुप्रिया सुळे, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी विज्ञान केंद्राचे चेअरमन राजेंद्र पवार, राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलपती के. विश्वनाथन, डॉ. अशोक फरांदे, जिल्हा परिषद अध्यक्ष विश्वास देवकाते, जैन इरिगेशनतर्फे विपणनप्रमुख अभय जैन उपस्थित होते.

हा समारंभ डॉ. आप्पासाहेब पवार सभागृहात झाला. प्रकल्पाची आखणी, अभियांत्रिकी कामे, रोगमुक्त रोपांचा पुरवठा, बांधकाम, प्रशिक्षण व देखभाल उत्कृष्टपणे केल्याने जैन इरिगेशनचा गौरव केला. हा सत्कार अभय जैन यांनी स्वीकारला. भाजीपाला उत्कृष्टता केंद्रासाठी पॅट्रॉन ॲग्री इंटरनॅशनल, हॉर्टिमॅक्स, हॉलंडडोर, नेदरलँड, फिस्केअर फ्रान्स, नानदान जैन यांनीही सहकार्य केले आहे. या प्रकल्पात जैन इरिगेशनचे प्रकल्प प्रमुख एस. एन. पाटील, विक्रांत किरकटे, अभियंते शरद पाटील, मिलिंद मोरवाल, भूषण मुथा, सुरज महाडिक, उमेश नावंदर, प्रवीण पाटील, प्रवीण चौधरी यांचा मोलाचा सहभाग राहिला आहे.

## मातीविना शेतीतील पुढचा प्रयोग

*बारामती येथे उभारण्यात आलेल्या इंडो-डच भाजीपाला गुणवत्ता प्रकल्पात प्रमुख पिकांमध्ये टोमॅटो, मिरची, काकडी, स्टॉबेरी यांचा समावेश असेल. भाज्यांसाठीचे बी-बियाणे वंशवृद्धी युनिट येथे आहे. रोपांची उगवण क्षमता वाढविण्यासाठी कोकोपीट बॅग्ज वापरण्यात आल्या आहेत. पाणी शुद्धिकरण करण्यासाठी एक युव्हीचे युनिट, खते सूक्ष्म सिंचनातून देण्यासाठी फर्टिगेशन युनिट, इसी आणि पीएच मोजमापाची सुविधा, पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ९० एमक्युब क्षमता असलेले तीन सिलो युनिट उभारण्यात आले आहेत. तसेच कोकोपीट बॅगसाठी स्टेक ड्रिपल, ॲंटिलॉक ऑनलाईन ड्रीप सिस्टिम आणि माती नसलेले इनलाईन टर्बोएक्सेल पाईप सिस्टिम वापरण्यात येणार आहे. यामुळे मातीविना शेतीतील पुढचा प्रयोग इंडो-डच तंत्रज्ञानाचे सेंटर ऑफ एक्सलन्स येथे करण्यात आला आहे.*

इंडो-डच अंतर्गत भारतात पहिल्यांदा असा प्रकल्प स्थापन केला आहे जो पाणी, खते आणि विजेची बचत तर करतोच; पण उत्पादकता वाढीसाठी पिकांमध्ये गुणवत्ताही टिकवून ठेवतो. यासाठी निरोगी व रोगमुक्त रोपांचा पुरवठा केला जाणार आहे. यात जैन इरिगेशनचा महत्त्वाचा वाटा असल्याचे नेदरलँडचे कृषिमंत्री यांनी स्पष्ट केले. कृषिमंत्री फुंडकर म्हणाले की, बारामतीसारखी कृषी विज्ञान केंद्रे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात झाल्यास कृषी क्षेत्रात राज्य प्रगतिपथावर जायला वेळ लागणार नाही...